# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.05.2026** **वारः बुधवार**

1. हरित तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रात नॉर्डिक देशांसोबतची धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ होण्याचा, पंतप्रधानांचा विश्वास
2. नीट पेपरफुटी प्रकरणात काल 'सीबीआय'चे नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील तीन विद्यार्थ्यांच्या घरांवर छापे
3. नवी दिल्लीतल्या पंतप्रधान संग्रहालयात आजपासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यावर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित थ्री डी प्रकल्पाची सुरुवात
4. अखिल भारतीय औषध विक्रेता संघातर्फे आज देशव्यापी बंद आणि
5. अफगाणिस्तान विरुद्ध होणाऱ्या कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेट सामन्यांसाठी भारतीय संघ जाहीर

<u>पंतप्रधान</u>

हरित तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातील नॉर्डिक देशांसोबतची भारताची धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ होईल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. तिसऱ्या भारत नॉर्डिक शिखर परिषदेनंतर घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते काल बोलत होते. भारत नॉर्डिक देशांमधल्या संबंधात सातत्यानं वाढ होत असून गेल्या दशकात नॉर्डिक देशांची भारतातली गुंतवणूक दोनशे टक्क्यांनी वाढली आहे असं ते म्हणाले. यामुळे भारताच्या विकासाला हातभार लागण्याबरोबरच नॉर्डिक देशांमधल्या रोजगाराच्या संधीही वाढल्या आहेत. भारत आणि नॉर्डिक देशांमध्ये विद्यापीठं, प्रयोगशाळा आणि स्टार्टअप परिसंस्थांमधील भागीदारी दृढ करुन संशोधन, कौशल्य विकास आणि गुणवत्तेच्या आदानप्रदानाला प्रोत्साहन दिलं जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

भारतानं ऑक्टोबर 2025 ला नॉर्वे, आइसलँड या देशांसोबत व्यापार आणि आर्थिक करार केले, तसंच काही महिन्यांपूर्वीच युरोपियन युनियनसोबतही मुक्त व्यापार करार केला. या महत्त्वाकांक्षी कराराद्वारे एका सुवर्णयुगाची सुरुवात होत आहे, भारत आणि नॉर्डिक देश यांच्यात संशोधन आणि नवोन्मेष भागीदारी दृढ केली जाईल असंही मोदी म्हणाले.

तिसरी भारत-नॉर्डिक शिखऱ परिषद काल नॉर्वेची राजधानी ओस्लो इथं झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह नॉर्वे, स्वीडन, आइसलँड, फिनलँड आणि डेन्मार्कचे प्रधानमंत्री या परिषदेत सहभागी झाले होते .

या परिषदेआधी मोदी यांनी आइसलँड, फिनलँड, डेन्मार्क या देशांच्या पंतप्रधानांशी द्विपक्षीय चर्चा केली .

दरम्यान, काल रात्री पंतप्रधान इटलीला पोहोचले असून, इटलीची राजधानी रोम इथ त्यांच भव्य स्वागत करण्यात आल. या दौऱ्यात ते इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि राष्ट्राध्यक्ष सर्जिओ माटारेला यांच्याशी द्विपक्षीय सहकार्याबाबत चर्चा करतील.

<u>रुबियो</u>

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मारको रुबियो येत्या शनिवारपासून चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत . रुबियो यांचा हा पहिलाच भारत दौरा असून या दरम्यान ते कोलकाता, आग्रा, जयपूर आणि नवी दिल्लीला भेट देतील. 26 मे रोजी ते क्वाड देशांच्या बैठकीत सहभागी होणार असल्याच दिल्लीतल्या अमेरिकेच्या दूतावासतर्फे सांगण्यात आल. क्वाड देशांच्या गटात भारतासह ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिका हे देश सामील आहेत .

<u>अन्न पूर्णा योजना</u>

पश्चिम बंगाल मधील भाजप प्रणीत नवनिर्वाचित सरकारने महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी अन्नपूर्णा योजना जाहीर केली असून, त्याद्वारे आर्थिक दृष्ट्या दुर्बल महिलांना दर महिन्याला 3 हजार रुपयांची मदत दिली जाणार आहे. महिला, बालविकास तसच समाजकल्याण विभागाच्या वतीने ही योजना राबवण्यात येणार असून ती येत्या 1 जून पासून लागू होईल. या योजने अंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या आधार कार्डशी जोडल्या गेलेल्या बँक खात्यात हे मदतीचे पैसे जमा होणार आहेत . या योजनेसाठी पात्र महिलांची वयोमार्यादा 25 ते 60 वर्ष ठेवण्यात आली असून 1 जून पासून अन्नपूर्णा योजनेसाठी अर्ज करण्यासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू केल जाणार आहे. या शिवाय विद्यमान लक्ष्मी भंडार योजनेतील पात्र महिला आता या अन्नपूर्णा योजनेच्या लाभार्थी म्हणून स्थानांतरित होणार आहेत .

<u>करार</u>

महाराष्ट्रात अणुऊर्जा निर्मिती करण्यासाठी राज्य सरकारनं चार कंपन्यांशी काल सामंजस्य करार केले. नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड, अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि बजाज उद्योग समूहाच्या ललितपूर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड या चार कंपन्यांशी सुमारे साडेसहा लाख कोटी रुपये गुंतवणुकीचे हे सामंजस्य करार असून यातून 25 हजार 400 मेगावॅट अणुऊर्जा तसंच 1 लाख 23 हजार 500 रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. यावेळी राज्याचे पारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे यांच्यासह या कंपन्यांचे आणि शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

'स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक देशाला संपन्न ऊर्जाराष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे', असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

**छापे**

नीट पेपरफुटी प्रकरणात काल केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात 'सीबीआय'नं नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात तीन विद्यार्थ्यांच्या घरांवर छापे टाकून झडती घेतली. या कारवाईदरम्यान, महत्त्वाची कागदपत्रं, हस्तलिखित नोट्स तसंच इलेक्ट्रॉनिक साहित्य जप्त करण्यात आलं. जप्त करण्यात आलेल्या नोट्स आणि फुटलेल्या प्रश्नपत्रिकांमध्ये साम्य आहे का, याची तपासणी आता फॉरेन्सिक पातळीवर केली जाणार आहे. देशभरातल्या किमान एक हजार विद्यार्थ्यांनी फुटलेले पेपर खरेदी केले असल्याचा सीबीआयचा अंदाज असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

दरम्यान, नीट युजी फेरपरीक्षेचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक झाली. ही परीक्षा प्रामाणिकपणे आणि संपूर्ण पारदर्शकतेनं घेण्याचा पुनरुच्चार करत प्रधान यांनी परीक्षा प्रक्रियेत याआधी आढळून आलेल्या कोणत्याही त्रुटी न ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**बंद**

अखिल भारतीय औषध विक्रेता संघानं विविध मागण्यांसाठी आज 'एक दिवसीय देशव्यापी बंद' पुकारला आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी औषध आणि अन्न-प्रशासनानं आवश्यक उपाययोजना केल्या असून सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत. नागरिकांनी बंदच्या काळात अत्यावश्यक औषधांसाठी अन्न आणि औषध प्रशासनाच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.
ऑनलाइन औषध विक्री बंद करा, कॉर्पोरेटसद्वारे अव्यावसायिक सवलत देणं बंद करा आणि बनावट औषध विक्रीला आळा घाला अशा औषध विक्रेत्यांच्या मागण्या आहेत. औषधविक्रीबाबत कठोर नियमावली आणि पारदर्शकता आवश्यक असून यासाठी केंद्र सरकारनं कायदे करावेत अशीही मागणी संघटनेनं केली आहे.

**संग्रहालय**

नवी दिल्लीतल्या पंतप्रधान संग्रहालयात आज पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यावर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अत्याधुनिक प्रकल्प सुरू होत असून, याद्वारे नागरिक महात्मा गांधी यांच श्री डी स्वरूपातील व्यक्तिमत्व निर्माण करण्यात येणार असून, संग्रहलयाला भेट देणारे नागरिक त्यांच्या या डिजिटल व्यक्तिमत्वाशी संवाद साधू शकणार आहेत. महात्मा गांधी यांच्यावरील संग्रहालयात उभारण्यात आलेला हा तिसरा इंटरॅक्टिव्ह होलो बॉक्स असून यापूर्वी सरदार वल्लभभाई पटेल आणि माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांच्या वरील अशाप्रकारचा होलो बॉक्स प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. लवकरच माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यावरील अशाप्रकारचा ए आय तंत्रज्ञानावर आधारित थ्री डी प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे .

**रेल्वे**

भारतीय रेल्वेने देशात ब्रॉड गेज मार्गिका जाळ्याच्या विद्युतीकरणाच 99 पूर्णांक 6 टक्के काम पूर्ण केल आहे. यावर्षीच्या मार्च पर्यंत ब्रॉड गेज रेल्वे मार्गिकेच्या 69 हजार 8 शे 73 किलोमीटर पेक्षा जास्त मार्गा च विद्युतीकरण पूर्ण झाल होत. या महत्वपूर्ण प्रकल्पामुळे भारताने युरोपीय संघ, अमेरिका आणि ब्रिटनसहित जगातल्या अनेक प्रमुख देशांना रेल्वे विद्युतीकरणात मागे टाकल आहे.

**क्रिकेट संघ**

अफगाणिस्तान विरुद्ध होणाऱ्या कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेट सामन्यांसाठी भारतीय संघ काल जाहीर झाले. दोन्ही प्रकारांसाठी कर्णधार म्हणून शुभमन गिल तर उपकर्णधारपदी के.एल.राहुलची निवड करण्यात आली. कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांसाठी जसप्रित बुमराह आणि रवींद्र जडेजा यांना विश्रांती दिली आहे तर एकदिवसीय संघातून ऋषभ पंत याला वगळलं असून प्रिन्स यादव याची निवड झाली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार .